Pc/4/E/yugendra/circular

# मुंबई विद्यापीठ

क. संलग्नता/आय.सी.सी./२०२४–२५/ ४२ /२०२५

परिपत्रक:

**विषय: AISHE व Students on Roll प्रमाणपत्र/हमीपत्र बाबत**

संदर्भ:– सांख्यिकी कक्ष पत्र क. AAQA/ICD/2024-25/1634 of 2024, दिनांक २६ डिसेंबर, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना उपरोक्त संदर्भांकित पत्राअन्वये खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्यामार्फत AISHE (All India Survey on Higher Education) असा ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेले असून त्यात सर्व विद्यापीठातील विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था यांची सर्वकष माहिती विहित वेळेत संकलित करण्याचे कामकाज राज्यातील प्रत्येक विद्यापाठाला देण्यात आलेले आहे. सदरची माहिती ही संचालनालयाला माहितीपुर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरीता संशोधन करण्यासाठी उपयुक्त असते.

तसेच विद्यापीठाला शासनास व विविध प्राधिकरणांस आवश्यक असलेली माहिती विवरणपत्रानुसार वेळोवेळी पाठवावी लागते. त्यासाठी शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष) विभागाने Students on Roll हा ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेला असून सर्व विद्यापीठ विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्याकडून माहिती ऑनलाईन स्वरूपी संकलित केली जाते.

त्या अनुषंगाने सदर विभागामार्फत परिपत्रक, स्मरणपत्रे, ईमेल व दुरध्वनीद्वारे माहिती वेळेत ऑनलाईन भरण्याविषयी कळविण्यात येते. परंतु अनेक संलग्नित महाविद्यालये/संस्था सदरची अपेक्षित माहिती विहित वेळेत सादर करत नाही अथवा चुकीची सादर करतात. सदर बाबतीत शासनाचे वरिष्ठ अधिकारी तीव्र नाराजी व्यक्त करतात व त्याबाबत मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू व मा. कुलसचिव यांना याबाबत विचारणा करण्यात येते.

सदरची माहिती ही संचालंनालयाला माहितीपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरीता संशोधन करण्यासाठी उपयुक्त असते म्हणून मा. कुलगुरूंनी महाविद्यालये/संस्था यांनी माहिती सादर न केल्यास विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांची आपल्या विभागाशी संबंधित असलेली कामे शैक्षणिक नियुक्तया व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष) विभागाकडून ना–हरकत प्रमाणपत्र/हमीपत्र प्राप्त झाल्याशिवाय स्विकारू नयेत, अशाप्रकारचे आदेश दिलेले आहेत.

२/–

वरील विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३—२४ या वर्षाचे **“ना—हरकत प्रमाणपत्र/हमीपत्र”**, नोडल अधिकारी, शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष) यांचे कडून प्राप्त करून घेण्यात यावे अन्यथा आपल्या महाविद्यालयाचा कोणताही प्रस्ताव (महाविद्यालय व संलग्नता विभागाशी संबंधीत असलेला) स्वीकरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :— मुंबई—४०० ०३२
दिनांक:— ०७ जानेवारी, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रती,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

# मुंबई विद्यापीठ

## शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष)

## AISHE & Students on Roll

## प्रमाणपत्र/हमीपत्र

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४

दिनांक :

असे प्रमाणित करण्यात येते की, आपण दिलेल्या प्र-पत्राच्या वहित नमुन्याप्रमाणे संकलित केलेली माहिती रकान्यानुसार खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | विषय व संकेतस्थळ | परिपत्रक क्रमांक | माहिती भरली आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी संख्या माहिती (Students on Roll) शै. व. २०२३-२४ www.eoffice.mu.ac.in/statistical | No. UDSTAT/ICD/2023-24/905 of 2022, dated 10th October, 2023 | | रकान्यात नमूद केलेली सर्व संबंधित ऑनलाईन माहिती **शै. व. २०२२-२३** बाबतचे सदर कक्षाकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र/हमीपत्राची प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे अनिवार्य आहे. |
| २. | अखिल भारतीय उच्च शिक्षण संस्था (AISHE) शै. व. २०२३-२४ www.aishe.gov.in | No. AAQA/ICD/2023-24/1591 of 2024, dated 17th December, 2024 | | |

उपरोक्त रकान्यानुसार दर्शविल्याप्रमाणे पोर्टलवर भरलेली अत्यावश्यक ऑनलाईन माहिती परीपूर्ण व अचूक आहे. संबंधित माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयाचा/संस्थेचा प्राचार्य/संचालक या नात्याने मी सर्वस्वी जबाबदार राहील, याची मी ग्वाही देतो/देते.

(____________________)
प्राचार्य/संचालक
(नाव, सही व शिक्का)

Contact No. :- __________

Email ID :- ____________________

## कार्यालयीन कामकाजाकरीता

महाविद्यालय/संस्था यांची AISHE, MIS व Students on Roll शैक्षणिक वर्ष **२०२३-२४** या वर्षाची माहिती शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष) विभागाकडे प्राप्त झालेली असून सदर महाविद्यालय/संस्था यांचे **परीक्षा अर्ज/नोंदणी अर्ज व महाविद्यालय/संस्था यांची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval)** स्विकारण्यास तसेच **जाहिरात मुसदा व बिंदूनामावली** तपासण्यास हरकत नाही.

**(अकील अ. शेख)**
नोडल अधिकारी,
(AISHE/MIS Cell)